**ठळक बातम्या**

- शेतकऱ्यांना नुकसान भरपाई या महिनाअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश /अल्प, अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना हात आखडता न घेण्याचं बँकांना आवाहन
- लोकसभेच्या सभापतीपदासाठी उद्या निवडणूक / राष्ट्रीय लोकशाही आघाडीतर्फे ओम बिर्ला तर विरोधकांकडून काँग्रेसचे के. सुरेश रिंगणात
- विधानपरिषदेच्या ४ जागांसाठी उद्या मतदान
- पुणे पोर्शे अपघात प्रकरणातल्या अल्पवयीन आरोपीची बालसुधारगृहातून तत्काळ सुटका करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

  **आणि**

- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ७१२ अंकांची वाढ नोंदवत ७८ हजाराच्या वर बंद

**<><><><><>**

अल्प, अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना बँकानी हात आखडता घेऊ नये, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. ते आज मुंबईत राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या १६३ व्या बैठकीत बोलत होते. शेती हे महाराष्ट्राचं बलस्थान आहे. म्हणून शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे. बँकानीही शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात पाठबळ दिलं पाहिजे, असं ते म्हणाले.

पीक कर्ज देताना शेतकऱ्यांना 'सिबील स्कोअर'ची सक्ती केली जाऊ नये. राज्यातल्या जिल्हा सहकारी बँका, तसंच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांच्या बळकटीकरणाला प्राधान्य दिलं जावं, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. यावेळी समितीनं सादर केलेल्या, राज्याच्या सन २०२४-२५ साठीच्या ४१ हजार २८६ कोटी रुपयांच्या वार्षिक पत आराखड्याला मान्यता देण्यात आली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील, कृषी मंत्री धनंजय मुंडे, सहकार मंत्री दिलीप वळसे -पाटील या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृहात आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातल्या खरीप पिकांचा आढावा घेतला. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, शेती नुकसान भरपाईसाठीच्या मदतीचं वाटप ३० जूनपर्यंत पूर्ण करावं, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिले आहेत. सरकारनं शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करावी, शेतीच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी उपग्रह तंत्रज्ञानाचा वापर करावा, कृषी विद्यापीठांनी नवीन संशोधनावर भर द्यावा, ज्या भागात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे अशा भागात विशेष लक्ष केंद्रित करावं अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या.

या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, कृषी मंत्री धनंजय मुंडे, पणन मंत्री अब्दुल सत्तार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, मृदा आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

लोकसभेच्या सभापतीपदासाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं ओम बिर्ला यांना पुन्हा संधी दिली आहे. आज त्यांनी सभापतीपदासाठी अर्ज भरला. विरोधकांकडून काँग्रेस खासदार के. सुरेश यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. या पदासाठी उद्या निवडणूक होणार आहे.

लोकसभेच्या सभापतींची निवड एकमतानं आणि बिनविरोध व्हायला हवी असं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजीजू यांनी म्हटलं आहे. सरकारनं विरोधकांशी चर्चा करुन सहमतीचा प्रयत्न केला. पण विरोधकांनी उप सभापतीपदाच्या

उमेदवाराचं नाव जाहीर करण्याची मागणी केली. ते योग्य वेळी जाहीर करू असं सत्ताधारी पक्षानं सांगितलं. सहमती ही अटींशिवाय व्हायला हवी, असं रिजीजू म्हणाले.

<><><><><>

१८ व्या लोकसभा अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी अनेक खासदारांनी सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, शिवसे‍ेनेचे श्रीकांत शिंदे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, भाजपाचे नारायण राणे यांनी सदस्यत्वाची शपथ घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित राज्यसभा सदस्य सुनेत्रा पवार यांनी आज सदस्यत्वाची शपथ घेतली. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांना शपथ दिली.

<><><><><>

विधानपरिषदेच्या मुंबई आणि कोकण पदवीधर तसंच नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघांसाठी उद्या मतदान होणार आहे. सकाळी ७ वाजेपासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत हे मतदान होईल. या मतांची मोजणी १ जुलै रोजी होणार आहे.

मुंबई पदवीधर मतदारसंघात ८, कोकण पदवीधरमध्ये १३, नाशिक शिक्षकमध्ये २१ तर मुंबई शिक्षक मतदारसंघात १३ उमेदवार रिंगणात आहेत.

<><><><><>

विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात झाली. या निवडणुकीसाठी २ जुलै रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज सादर करता येतील ३ जुलै रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारी अर्ज मागे

घेण्याची मुदत ५ जुलैपर्यंत आहे. १२ जुलै रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळात मतदान होईल.

मनीषा कायंदे, विजय गिरकर, अब्दुल्ला दुर्राणी, निलय नाईक, अनिल परब, रमेश पाटील, रामराव पाटील, वजाहत मिर्झा, प्रज्ञा सातव, महादेव जानकर आणि जयंत पाटील यांचा कार्यकाळ संपत असल्यानं ही निवडणूक होत आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या परिस्थितीविषयी आणि विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्लीतल्या काँग्रेस मुख्यालयात आज बैठक झाली. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस नेते राहुल गांधी, के. सी. वेणुगोपाल, मुकुल वासनिक यांच्यासह राज्यातले नेते या बैठकीला उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीत पक्षाच्या राज्यातल्या कामगिरीविषयी खर्गे यांनी सर्वांचं अभिनंदन केलं आणि मतदारांचे आभार मानले.

**<><><><><>**

राज्यात दरड कोसळल्यानं किंवा भूस्खलनानं गाडल्या गेलेल्या गावातल्या बाधितांना प्रकल्पग्रस्तांचा दर्जा देण्याचा निर्णय आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे अनेक वाड्या, वस्त्या, तांडे, पाडे, आणि गावातल्या बाधितांना न्याय मिळणार आहे. कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे बाधित गावांना विशेष निधी देण्याचा तर सातारा जिल्ह्यातल्या तारळी प्रकल्पग्रस्तांच्या भत्त्यात वाढ करण्याचा निर्णयही बैठकीत झाला.

यवतमाळ जिल्ह्यातलं अमडापूर आणि बीड जिल्ह्यातल्या गुणवंती प्रकल्पातल्या पात्र बाधितांचं विशेष बाब म्हणून पुनर्वसन करण्याला या बैठकीत मान्यता देण्यात आली. पुनर्वसित गावठाणांच्या विकासासाठी ग्रामविकास विभागाला अतिरिक्त निधी देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

**<><><><><>**

पुणे पोर्श कार अपघात प्रकरणातल्या अल्पवयीन आरोपीची बालसुधारगृहातून तत्काळ सुटका करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहेत. बाल न्याय मंडळानं आरोपीची बालसुधारगृहात रवानगी करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाला आव्हान देत आरोपीच्या आत्यानं उच्च न्यायालयात हेबियस कॉर्पस याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. अल्पवयीन मुलाला जामीन मंजूर झाल्यानंतर त्याला ताब्यात घेणं बेकायदेशीर आहे, असा युक्तिवाद यावेळी आरोपीच्या वकिलांनी केला. हा युक्तिवाद मान्य करत त्याची तत्काळ सुटका करण्याचे आणि आत्याच्या ताब्यात देण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, आरोपीचं समुपदेशन सुरू राहील, असंही न्यायालयानं यावेळी म्हटलं.

या प्रकरणात बळी गेलेल्यांच्या कुटुंबांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १० लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. अल्पवयीन आरोपीला जामीन मंजूर झाला असला तरी या प्रकरणातल्या दोषींवर कारवाई करणारच असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

**<><><><><>**

नीट परीक्षा घोटाळ्यातल्या आणखी एका आरोपीला लातूर पोलिसांनी अटक केली आहे. संजय जाधव असं या आरोपीचं नाव आहे. त्याला न्यायालयापुढं आज हजर केलं असता न्यायालयानं त्याला २ जुलैपर्यंत पोलीस कोठडी दिली.

याप्रकरणी लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात एकूण चार जणांवर गुन्हा दाखल आहे. आतापर्यंत त्यापैकी २ आरोपींना अटक केली आहे. नीट परीक्षा देणाऱ्या १२ विद्यार्थ्यांची परीक्षा प्रवेशपत्रं आरोपी संजय जाधव आणि जलीलखान पठाण यांच्या मोबाईलमध्ये आढळून आली आहेत.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज पहिल्यांदा ७८ हजारांचा टप्पा ओलांडला. दिवसअखेर सेन्सेक्स ७१२ अंकांची वाढ नोंदवत, ७८ हजार ५४ अंकांच्या विक्रमी पातळीवर बंद झाला. व्यवहारादरम्यान सेन्सेक्सनं ७८ हजार १६५ अंकांच्या उच्चांकाला स्पर्श केला होता.

निफ्टीनंही आज पहिल्यांदाच २३ हजार ७०० अंकांची पातळी ओलांडली. दिवसअखेर निफ्टी १८३ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ७२१ अंकांवर बंद झाला. निफ्टी बँकही पहिल्यांदाच ५२ हजारांच्या पलीकडे जाऊन स्थिरावला.

बँकिंग, माहिती तंत्रज्ञान आणि वित्तीय क्षेत्रातल्या समभागांमुळं बाजारात आज तेजी झाली.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. यावेळी मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल, तसंच किनारपट्टी भागात सोसाट्याचे वारे वाहतील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**